**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धी पत्रक**

- **मिरा भाईंदर महापालिकेच्या फराळ सखी उपक्रमाची यशस्वी सांगता**
- **शहरातील महिला बनल्या व्यावसायिक उद्योजिका**

मिरा भाईंदर महापालिकेच्या फराळ सखी उपक्रमाची मंगळवारी यशस्वी सांगता झाली. नीती आयोगाच्या महिला उद्यम मंच आणि सेंटर फॉर एज्युकेशन, गव्हर्नन्स अँड पॉलिसी फाऊंडेशन (सीईजीपी) यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमाअंतर्गत, लहान स्वरुपात गृहोद्योग करणाऱ्या महिलांना प्रशिक्षण देऊन, बाजारपेठ उपलब्ध करून त्यांचा व्यावसायिक उद्योजक होण्याचा प्रवास सुरू झाला आहे.

महिलांना कायमस्वरूपी उद्योग, रोजगार आणि बाजारपेठ मिळावी यासाठी आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) यांच्या संकल्पनेतून ‘फराळ सखी’ हा उपक्रम राबविण्यात आला होता. हा उपक्रम दिवाळीदरम्यान प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात आला होता. ज्यात महिलांना व्यावसायिक फराळ बनविण्याचे तसेच पॅकेजिंग, ब्रँडिंग आदींचेही प्रशिक्षण देण्यात आले होते, यासह बाजारपेठ उपलब्ध करून दिली. या उपक्रमाला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आणि दिवाळीत तब्बल ३ टन फराळाची विक्री झाली. या उपक्रमाची दखल केंद्र शासनाच्या निती आयोगाने घेतली होती. नीती आयोगाच्या महिला उद्यम मंचातंर्गत ‘अवॉर्ड टू रिवॉर्ड’ उपक्रमासाठी फराळ सखीला मान्यता देऊन त्यांचा थेट पाठिंबा मिळाला. या विशेष उपक्रमांतर्गत, मिरा भाईंदरमधून विविध निकषांच्या आधारे २५ महिलांची निवड करून त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले.

जानेवारीत महिन्यात ‘अवॉर्ड टू रिवॉर्ड’ या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला होता. या कार्यक्रमाअंतर्गत क्षमता निर्मिती सत्रे घेण्यात आली. गजानंद आंधळे यांनी (विपणन आणि उद्योजकता) विकास कुमार आणि पीटर रिचर्ड्स यांनी (वित्त आणि क्रेडिट व्यवस्थाप) अभिनव श्रीवास्तव यांनी (कायदेशीर आणि अनुपालन) आदी विषयांवर मार्गदर्शन केले. विकास शर्मा यांनी ब्रँडिंग आणि पॅकेजिंग रणनीती सांगितल्या. डिजिटल मार्केटिंग, ग्राहक संपादन आणि आर्थिक नियोजन यावरही विशेष सत्र घेण्यात आले होते. याशिवाय उत्पादक कारखाने-कार्यशाळांना भेटी देण्यात आल्या. भाईंदर येथील त्रिपाठी स्नॅक्स, वऱ्हाडी मिसळ आणि ठाण्यातील प्रसादालय हॉटेल आदी ठिकाणी भेटी देऊन प्रत्यक्ष कामाची अनुभूती महिलांना घेता आली. प्रशिक्षणानंतर, महिलांचे

मूल्यमापन करण्यात आले ज्यातून ८ उत्कृष्ठ महिलाची निवड करण्यात आली. या ८ महिला संपूर्ण फराळ सखी उद्योग चालवणार आहेत. यांना व्यावसायिक उद्योजिका धडविण्यासाठी सर्वोतपरी मदत केली जाणार आहे. फराळ सखी उपक्रमाच्या सांगतेवेळी, महिला उद्योजक म्हणून उभ्या राहिल्या आहेत.

नव्याने स्थापन करण्यात आलेल्या घोडबंदर डेपो येथे मध्यवर्ती स्वयंपाकघरात (सेंट्रलाइज्ड किचन) फराळ सखी उपक्रमाची सांगता झाली. यावेळी सर्व महिलांच्या प्रयत्नांची दखल घेऊन आणि त्यांनी प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यासह, या कार्यक्रमात महिलांच्या हाती सेंट्रलाइज्ड कीचन देण्यात आले. यासह, पदार्थ बनविण्यासाठी आवश्यक असणारी साधन-सामुग्री, खाद्यपदार्थांच्या विक्रीसाठी विक्री केंद्रे आणि इतर आवश्यक साहित्य आदी महिलांना प्रदान करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला महापालिका आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से), अतिरीक्त आयुक्त सचिन बांगर, महापालिकेचे शहर अभियंता दीपक खांबित, उपायुक्त प्रसाद शिंगटे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच सीईजीपी फाऊंडेशनचे संचालक कैलास गिते, सर्व प्रशिक्षणार्थी महिला, महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

**कोट**

फराळ सखीच्या प्रशिक्षणाने, लहान गृहोद्योग करणाऱ्या महिलांचा घरगुती मायेचा स्पर्श घेऊन व्यावसायिक उद्योगाचा प्रवास सुरू करत आहेत. उद्योगात अनेक अडथळे, अडचणी येतील त्यांना सामोरे जाण्यासाठी प्रशिक्षण दिले असले तरी नैराश्य येऊ शकते अशावेळी तुमची एकी, एकमेकांची साथ उपयोगी पडेल. तसेच महानगरपालिका वेळोवेळी तुमच्या सहाय्यासाठी उपलब्ध असेल. या उपक्रमातून महिला नेतृत्त्व, सक्षमीकरण आणि आर्थिक विकासाचे उद्दीष्ट साध्य होताना दिसत आहे. आज फराळ सखी उपक्रमातून उद्योजिका बनलेल्या महिला पुढील फराळ सखीच्या भागात नव्या महिलांना आत्मविश्वास वाढवताना दिसतील, शिवाय त्यांना संधीही देतील.

**मा. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से), आयुक्त तथा प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका**.